# NUTA BULLETIN

FORTNIGHTLY JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHER'S ASSOCIATION

Regd. No. ATI 263 *Licensed to post without prepayment No. ATI 10

Year: 21 **1st January 1996** No. 1


## □□□□□□□

**of the General Body Meeting of**
**NAGPUR UNIVERSITY TEACHERS'ASSOCIATION**
**held at 12.00 noon on *SUNDAY, the 15th October, 1995 at* Karmavir Mahavidyalaya Mul.**
(Dist. Chandrapur)

The General Body of NUTA met in the hall of Karmavir Mahavidyalaya Mul. (Dist. Chandrapur) at 12 noon on SUNDAY, the 15th October, 1995. Prof.B.T.Deshmukh, President was in the chair. The membership numbers of the **members present** at the meeting are as follows :-

0017, 0044, 0048, 0058, 0060, 0064, 0065, 0090, 0111, 0137, 0167, 0172, 0179, 0204, 0208, 0238, 0311, 0389, 0454, 0456, 0469, 0496, 0525, 0531, 0540, 0543, 0545, 0547, 0551, 0552, 0557, 0577, 0581, 0583, 0662, 0737, 0738, 0739, 0807, 0944, 1014, 1015, 1055, 1056, 1076, 1083, 1118, 1129, 1148, 1165, 1177, 1247, 1251, 1258, 1281, 1310, 1347, 1348, 1383, 1406, 1420, 1441, 1442, 1560, 1629, 1656, 1715, 1770, 1815, 1825, 1830, 1831, 1835, 1836, 1837, 1876, 2019, 2041, 2070, 2087, 2088, 2090, 2092, 2128, 2129, 2154, 2159, 2352, 2353, 2370, 2416, 2550, 2656, 2690, 2730, 2761, 2822, 2823, 2888, 2933, 3003, 3073, 3081, 3245, 3298, 3299, 3300. 3316, 3357, 3375, 3384,

### ITEM NO. 182 :
### *CONFIRMATION OF MINUTES :*

**CONFIRMED** the minutes of the General Body meeting of Nagpur University Teachers' Association held at 12.00 noon on *SUNDAY, the* 7th May, 1995 at Shri Shivaji College of Education, **Amravati** *(copy of the minutes was circulated on page no.33 to 35 of 1995 NUTA Bulletin).*

**विषय क्रमांक : १८२ (१)**
**प्रा. के.ए.चंदनगिरीवार यांचे दुःखद निधन :**

प्रा.मा.ना.अंधारे यांनी प्रा. के.ए.चंदनगिरीवार यांचे दुःखद निधनाबद्दल मांडलेला पुढील शोक प्रस्ताव **सम्मत करण्यात आला** :-

"गडचिरोली येथील नुटाचे आजिव सदस्य व वाणिज्य विभागाचे विद्यार्थीप्रीय प्रा.के.ए.चंदनगीरीवार यांचे ३१ जुलै १९९५ ला ह्रदयविकाराच्या तिव्र धक्क्याने दुःखद निधन झाले.

या आकस्मिक निधनामुळे त्यांच्या कुटूंबियांवर दुःखद प्रसंग आला आहे. त्यांच्या दुःखात नुटाची ही आमसभा सहभागी आहे. त्यांच्या कुटूंबियांना दुःख सहन करण्याची शक्ती ईश्वर प्रदान करो अशी प्रार्थना ही सभा करीत आहे."

**विषय क्रमांक : १८२ (२)**
**प्रा. भा.मा.पुराणिक यांचे दुःखद निधन :**

प्रा.अ.य.माधमशेट्टीवार यांनी प्रा.भा.मा.पुराणिक यांचे दुःखद निधनाबद्दल मांडलेला पुढील शोक प्रस्ताव **सम्मत करण्यात आला** :-

"प्रा श्री.भा.मा.पुराणिक लो.टि.महाविद्यालय वणी आजीव सदस्य नुटा यांचे जुलै १९९५ मध्ये आकस्मीक निधन झाले त्याबद्दल ही सभा तिव्र शोक व्यक्त करीत आहे."

शोक प्रस्ताव मांडणाऱ्या सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. अध्यक्षांनी सुध्दा आपल्या भावना व्यक्त केल्या. सभेने दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून दिवंगत सदस्यांना आपली आदरांजली वाहिली. सम्मत केलेल्या शोकप्रस्तावाची प्रत संघटनेच्या वतीने सचिव शोकाकूल कूटूंबियांकडे पाठवतील असे अध्यक्षांनी सांगितले.

### ITEM NO. 183 :
### *APPROVAL TO THE AUDITED STATEMENT.*

**Considered** and **approved** the Audited Balance Sheet and Income and Expenditure Account of the Association for the year ended on 31st March, 1995

***Notes*** *: (i) The copy of the Audited Balance sheet and Income and Expenditure Account of the Association for the said Financial year was circulated on page 52 of 1995 NUTA Bulletin.*

*(ii) The Audited Balance sheet and Income and Expenditure Account were placed before the General Body by Prof. E.H.Kathale, Secretary, on behalf of the Executive Committee.*

### ITEM NO. 184 :
### *STATEMENT ON FIXED SECURITIES POSITION :*

**Noted** the Statement no.6 showing the position of the Fixed Securities of the Association as on

**Nagpur University Teachers' Association**
**MEETING NOTICE : 1**

Dated : 1st January 1996

From :

**Prof. E. H. KATHALE**
Secretary, NUTA
N-162 Reshim Bag, Nagpur 444 009

To,
All the members of the
Nagpur University Teachers' Association

Dear members,

I have the honour to inform you that General Body meeting of the Nagpur University Teachers' Association will be held at 12.00 noon, on the Day and the Date mentioned below.

2. If you propose to move any resolution for the consideration of the General Body, you are requested to send such resolution to me, with a copy to Prof. B.T.Deshmukh, President NUTA, No. 3, Subodh Colony, Near Vidarbha Mahavidyalaya, Amravati 444604 within a period of 10 days from the date of the posting of this Bulletin.

3. It will not be possible to include in the agenda, resolutions received after the due date. So please make it convenient to send such resolutions, if any, within the stipulated time. The place of the meeting will be intimated to you along with the agenda.

Thanking you.

Yours faithfully
**Sd/- E. H. Kathale**
Secretary, NUTA.

***Time, Day and Date of the Meeting:***
***12.00 Noon on Sunday, the***
***10th March, 1996***

31st March 1995. *(Note : Statement no.6 regarding the fixed securities of the Association as on 31st March 1995, was circulated on page 51 of 1995 NUTA Bulletin.)*

### *विषय क्रमांक : १८५*
### *वर्ग तुकडीतील विद्यार्थांच्या संख्येमध्ये फार मोठ्या प्रमाणावर वाढ करणारे आदेश*

कार्यकारी मंडळाच्या वतीने डॉ.शरद कळणावत यांनी मांडलेला पुढील प्रस्ताव **सम्मत करण्यात आला :-**

"ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाच्या उच्च शिक्षण विभागाच्या दिनांक १९ जून १९९५ च्या एका शासननिर्णयाने कला, वाणिज्य व विज्ञान विद्याशाखेतील वर्ग तुकडीतील विद्यार्थांच्या संख्येमध्ये फार मोठ्या प्रमाणावर वाढ करणारे आदेश निर्गमित केले आहेत;

आणि ज्याअर्थी महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र प्राध्यापक संघ यांच्यामध्ये सर्व विद्यापिठांच्या मा. कुलगुरुंच्या उपस्थितीमध्ये व मा. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली, दिनांक १५ जुलै १९७७ रोजी, झालेल्या बैठकीमध्ये उभयपक्षी स्वाक्षरीत झालेल्या मतैक्यपत्रामध्ये स्पष्टपणे पुढील प्रमाणे मतैक्याचा मुद्दा नमूद आहे :-

**"Consensus No. 2 :** Consensus reached in the discussion of the representatives of the Maharashtra Federation of University and College Teacher's Organisations with the Chief Minister of Maharashtra on 4th June, 1977 and subsequent meeting held on 8th July 1977.

***Following were present on 4th June, 1977.***

**On Behalf of Government** 1) Chief Minister in the Chair, 2) Minister for Education, 3) Minister of State for Education, 4) Secretary, Education and Youth Service Department, 5) Director of Higher Education and Youth Service Department, 6) Director of Higher Education, Maharashtra State Pune, 7) Deputy Secretary, Education and Youth Services Department.

**Vice Chancellors** Shri. D.Y. Gohokar, V.C. Nagpur University Shri. D.A.Dabholkar, V.C. Poona University Shri. P.G.Patil, V.C. Shivaji University Smt. Madhuriben Shah, V.C. S.N.D.T. Women University Shri. Ram Joshi V.C. Bombay University.

**On Behalf of M.F.U.C.T.O.** 1. Shri. L.B. Keny President, & other Executive Committee Members 2. The discussions mainly centred round the four points and the detailed issues relating thereto, mentioned in the note circulated by the Education and Youth Service Department. While, pending further full consensus could not be reached on the point relating to "Work Load" consensus was reached on the remaining three points, namely "Size of a Class", "Vacation" and "Remuneration for Examination Work" and the same has been recorded below.

**SIZE OF A CLASS :** The existing stipulation of different Universities in regard to the maximum strength of students in a class (upto the first degree level) were noted. It was agreed in principle that a class of a large size, with more than 100 students, was not conducive to attainment of higher academic standards and that the size of a class will have to be progressively reduced to 60 students so as to improve the student-teacher ratio. As a first step towards the attainment of this ideal, it was agreed that the maximum strength of students in a class upto the first degree level of the new three- year degree course in college affiliated to the Bombay, Poona, Shivaji and S.N.D.T. Women's Universities should be 100 students, the University authorities may, however, in their discretion authorise the heads of Colleges to exceed this limit of 100 students by 10% (i.e. upto 110 students in a class). In exceptional cases, where there are compelling circumstances, the University authorities may permit admission of a few more students (in any case not more than five) in a class even in excess of 110.

So far as the Marathwada and Nagpur Universities are concerned, it was agreed that the status quo should be maintained (i.e. the maximum size of a class shall be 80 students with powers to the University authorities to allow, in their discretion, admission of students in excess of this limit)"

आणि; ज्या अर्थी नागपूर विद्यापीठाच्या अध्यादेश क्रमांक २० मध्ये (जो अमरावती विद्यापीठाला सुद्धा लागू आहे.) पुढील तरतूद स्पष्टपणे नमूद आहे :-

**महाराष्ट्र शासन क्र.एनजीसी-१२९४/१००५४/(२८५२)-विशि-४** *उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग,*
*मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२. दिनांक : १३ ऑक्टोबर, १९९५*

प्रति,
कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे,

**विषय** :- *अकृषि विद्यापीठे व संलग्नित अशासकीय महाविद्यालयातील अधिव्याख्यात्यांनी राष्ट्रीय पात्रता परिक्षा परिविक्षाधीन कालावधीत पूर्ण करणेबाबत.*

शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक एनजीसी-१२८६/(१२२४)/विशी-४, दिनांक २७.२.८९ अन्वये अकृषि विद्यापीठे, संलग्नित महाविद्यालये शासकीय विज्ञान/व्यवस्थापन अभ्यासक्रम/समाजशास्त्र संस्थामधील शिक्षकांची वेतनश्रेणी सुधारणे व उच्च शिक्षणाचा दर्जा राखण्यासाठी इतर उपाययोजना करण्याबाबतचे आदेश दि. १.१.८६ पासून लागू करण्यात आले आहेत. या आदेशानुसार १.१.८६ नंतर अधिव्याख्याता, प्रपाठक आणि प्राध्यापक, ग्रंथपाल व शारिरीक शिक्षक यांच्या सेवाशर्ती अर्हता ठरवून देण्यात आल्या आहेत. त्यानुसार अधिव्याख्याता व तत्सम पदासांठी पारंगत (पोस्टग्रॅज्युट) परिक्षेत कमी ५५ टक्के मार्कस वा समकक्ष ग्रेड व चांगला शैक्षणिक रेकॉर्ड असणे आवश्यक आहे. याशिवाय विद्यापीठ अनुदान आयोगाने ठरवून दिलेली पात्रता परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाने ज्या विविध परिक्षा उत्तीर्ण असणाऱ्यांना, सदर पात्रता परिक्षा पास होण्यातून सुट दिली आहे. त्याबाबतचे आदेश राज्य शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आले आहेत. या व्यतीरिक्त इतर सर्व अधिव्याख्याता वा तत्सम पदांना (नेटसेट) पात्रता परिक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे. जे आधिव्याख्याता व तत्सम पदधारक ही परिक्षा उत्तीर्ण होणार नाहीत त्यांना ३१.३.१९९६ नंतर सेवामुक्त करण्याचे शासनाचे आदेश आहेत.

दिनांक २७.२.८९ च्या शासन निर्णयाच्या अनुक्रमांक २५ मध्ये सेवेच्या इतर अटींचा उल्लेख असुन शिक्षकांचा परिविक्षाधीन कालावधी २४ महिन्यांच्या वर जाणार नाही असे म्हटले आहे. अधिव्याख्यात्यांना सेवेमध्ये पक्के करण्यासाठी (कन्फर्म्ड) अल्पकालीन प्रशिक्षण कार्यक्रम उत्तीर्ण होणे, समाधानकारक परफॉर्मन्स अप्रेझल अहवाल या गोष्टी विचारात घेतल्या जातात.

३. **शासनाच्या असे निर्दशनास आले आहे की, विहित अर्हता प्राप्त उमेदवारांच्या नियुक्त्या जरी ते पात्रता परिक्षा उत्तीर्ण नसले तरी केल्या जातात, व त्यांना परिविक्षाधीन कालावधीनंतर ठेवण्यात येते.** या परिविक्षाधीन कालावधीत जर अशा उमेदवारांनी विहीत परिक्षा पास केली नाही तर त्यांची पुढील देय वेतनवाढ रोखण्यात येते. काही प्रकरणात ही वाढ सुरूवातीस लक्षात न घेतल्याने पुढील वेतनवाढ मंजूर करण्यात आली आहे व आता लक्षात आल्यावर त्याची वसूली करण्याचे प्रस्तावित आहे. ज्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत असे घडले आहे त्यांचेकडून वसूली करण्यात येऊ नये. परंतू भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

४. विद्यापीठ अनुदान आयोगाने घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार शासनाकडून वेळोवेळी आदेश काढण्यात आले आहेत यापुढे अधिव्याख्याता पदावर नियुक्ती दिली जाणाऱ्या उमेदवारांने याकरिता आवश्यक शैक्षणिक अर्हता व पात्रता धारण केली आहे याची खात्री प्रथम करून घ्यावी व असे उमेदवार उपलब्ध न झाल्यामुळे जर शैक्षणिक अर्हता आहे, **परंतु पात्रता परिक्षा पास नसलेल्या उमेदवारांची नियुक्ती करावयाची झाल्यास त्यांची नियुक्ती ही तदर्थ नियुक्ती म्हणून करण्यात यावी. या नियुक्ती धारकांना सेवेचे कोणतेही लाभ (म्हणजेच एक वर्षानंतरची वेतनवाढ, नियमीत सेवा व ८ व १६ वर्षानंतर मिळणारी वरिष्ठ व निवडश्रेणी) मिळणार नाही याचीही संबंधीतांना योग्य वेळीच जाणीव द्यावी.**

**(त्रि.ब.सेन)**
उपसचिव, महाराष्ट्र शासन

" Faculties of Arts, Social Sciences, Science and Commerce, the size of the theory class shall be increased to such extent that lectures shall be delivered to 80 students at a time with a provision for an extra of ten percent for leaving off during the course of this session".

आणि; ज्याअर्थी १९ जून १९९५ च्या शासननिर्णयातील तरतुदी केवळ मतैक्यपत्राच्या विरुद्ध आहे असेच नव्हे तर गेल्या अनेक वर्षापासून विद्यापिठात अस्तित्वात असलेल्या अध्यादेशाचा सुद्धा भंग करणाऱ्या आहेत, इतकेच नव्हे तर विदर्भात अस्तित्वात असलेल्या वर्ग खोल्यांचा आकार लक्षात न घेता विद्यार्थ्यांना वर्ग खोल्यामधून कोंबण्याचा हा प्रकार संपूर्णपणे अशैक्षणिक आहे. वर्गातील विद्यार्थी संख्येबाबत राष्ट्राच्या व महाराष्ट्राच्या पातळीवर स्थिर झालेल्या विचारांचा उघडउघड अधिक्षेप या शासननिर्णयाने केला आहे.

त्याअर्थी हे सभागृह हा शासननिर्णय तत्परतेने मागे घेण्यात यावा अशी मागणी करीत आहे.

### *विषय क्रमांक १८६*
### *''नेट सेट'' बाबत संघटनेची भूमिका*

कार्यकारी मंडळाच्या वतीने प्रा. अनिल ढगे यांनी मांडलेला पुढील प्रस्ताव **सम्मत करण्यात आला :-**

" महाराष्ट्र प्राध्यापक संघाच्या १९९४ च्या वार्षिक अहवालाच्या परिच्छेद ६ मध्ये नेट सेट परीक्षेबाबत व्यक्त झालेल्या पुढील मताशी हे सभागृह पूर्ण सहमती व्यक्त करीत आहे :-

**6.National and State Eligibility tests :** 6.1 In the 1987 All India agreement for revision of pay scales, the condition of clearing eligibility test by candidates was provided. The AIFUCTO and MFUCTO are party to this and therefore, we welcome introduction of Eligibility test for candidates, However, its introduction to teachers retrospectively as one by our Government from 1-4-1990 is not acceptable to MFUCTO. The MFUCTO has made it clear that eligibility tests are for candidates who want to become teachers, while Refresher courses are for teachers. In view of the poor percentage of passing NET/SET all over the country including in Maharashtra arising strictly due to arbitrary choice of syllabus and mode of examination, the MFUCTO has already rejected the said TESTS in the present form in which they are being conducted. The MFUCTO demands that the NET/SET in their present form be forthwith abolished and calls upon the government to replace it by new eligibility test keeping in mind the fact that these Tests are for candidates who are to become teachers and not research assistants. A total modification of the mode of examination, fee structure from Rs. 600/- to Rs. 100/- for SET, syllabi content, etc. is necessary.

6.2 The MFUCTO is committed to the protection of each and every teacher who may be affected by the arbitrary decisions of the government in respect of NET/SET and if called for, a State-wide agitation against the government's arbitrariness will have to be organised in this respect."

***Notes :-*** *(1) General Secretary's Report - 1994 of Maharashtra Federation of University & College Teachers' Organizations was published on pages 40 to 44 of 1995 NUTA Bulletin*

*(2) This report was Adopted by the MFUCTO E.C. in its meeting held on 8th July 1995 at Nashik vide item No. 5 and approved by the General Council of MFUCTO in its meeting held at Nashik on 9th July 1995.*

### *विषय क्रमांक १८७*
### *५५ टक्के गुणांच्या अटीबाबत*

कार्यकारी मंडळाच्या वतीने प्रा.एकनाथ कठाळे यांनी मांडलेला पुढील प्रस्ताव **सम्मत करण्यात आला :-**

"विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक या नात्याने सेवेमध्ये भरती होतांना भरती होण्यापूर्वी उत्तीर्ण करावयाच्या “नेट सेट” परीक्षेला बसण्यासाठी पदव्युत्तर परीक्षेमध्ये ५५ टक्के गुण असणाऱ्यांनाच पात्र ठरविण्याच्या व्यवस्थेविषयी अखिल भारतीय प्राध्यापक संघाच्या महासचिवांनी रस्तोगी समितीला सादर केलेल्या ५ मे १९९५ च्या निवेदनातील परिच्छेद ११ मध्ये व्यक्त केलेल्या मताशी हे सभागृह सहमती व्यक्त करीत आहे. :-

**11. Recruitment of Teachers** The issue requires in depth and detailed study. AIFUCTO fully favours a uniform national policy in this respect. However, we have serious criticism on the ways NET/SET are functioning.

The first point of criticism is against stipulation that only those candidates who secure 55% marks in the Masters level would be eligible to sit for NET/SET. It is known to all academicians that 55 P.C. marks in different subjects does not indicate same level of achievement.

Besides, there is uniformity neither in standard of teaching-learning nor in marking in examination in our universities, In fact, this is the very basis for instituting NET/SET. Insisting on 55 p.c. marks at masters level irrespective of subject and institution is giving credence to these marks. At the same time even a candidate after securing 75 p.c. in the master's level is obliged to sit for NET/SET and is not eligible for direct appointment. What is worse and arbitrary to the extreme is that once a candidate fails to secure that magic 55 p.c. marks he/she even after completing M.Phil or Ph.D and establishing his/her scholarship is not found eligible. There are already hundreds of serving teachers who at different points of time got appointed and now are debarred automatically from UGC Scales. This requirement must be scrapped immediately."

***Notes :-*** *(1) All India Federation of University & College Teacher's Organisation Submitted its Second Memorandum To, Dr. R.P.Rastogi, Chairman, U.G.C. Committee on Revision of pay scales of University and College Teachers on May 5, 1995, signed by Prof. Mrinmoy Bhattacharyy General Secretary AIFUCTO and it is circulated on page 53 of 1995 NUTA Bulletin.*

## CHANGE OF ADDRESS ACKNOWLEDGEMENT NO. 12

Requests for changes in address for the purpose of mailing and correspondence, have been reaching us frequently from the members'. So to record these changes in Life Member's Register systematically, and to follow up these changes effectively, steps have been taken by The Treasurer.

2. We hereby acknowledge the receipt of the requests for change in address from members whose Life Membership Numbers and changed addresses are included in Seventeenth List of Changed Addresses of Life Members of NUTA. Details of the said list are as follows :-

**SEVENTEENTH LIST** :- Serialized Nos : of the changed Addresses from 607 to 653 (Notified on page 91 and 92 of 1995 Ex-File) The Life membership Numbers of those requesting members are as follows :

41, 212, 262, 264, 299, 344, 441, 503, 528, 549, 675, 741, 784, 992, 997, 1018, 1066, 1230, 1344, 1422, 1436, 1473, 1653, 1684, 1814, 1899, 2114, 2136, 2234, 2323, 2395, 2426, 2440, 2457, 2599, 2644, 2743, 2838, 2882, 3126, 3128, 3129, 3130, 3131, 3132, 3374, 3391.

3. No separate and individual acknowledgement shall be issued in this regard.

4. Hereafter requests for change in address shall be sent only to me ( Prof. S.A.Tiwari, Treasurer NUTA, 42, Shankar Nagar, Amravati-444 606.)

5. Members may please note that such requests sent to any other office bearer of NUTA Executive may not be speedily and effectively followed up. We hope that the members shall continue to cooperate with us to serve them better.

6. List No. 16 containing address changes from 542 to 606 was published as Acknowledgement No. 11 on page No. 21 of 1995 NUTA Bulletin.

**S.A.Tiwari** Treasurer NUTA

### *विषय क्रमांक : १८८*
### *रजा प्रवास सवलत विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना लागू करणे :*

कार्यकारी मंडळाच्या वतीने प्रा.एस.बी.चिंचमलातपूरे यांनी मांडलेला पुढील प्रस्ताव **सम्मत करण्यात आला :-**

"२३ ऑक्टोबर १९६३ च्या शासननिर्णयाने शासकिय कर्मचाऱ्यांना लागु करण्यात आलेली "स्वग्राम रजा प्रवास सवलत" पुढे वेगवेगळ्या शासन निर्णयांनी माध्यमिक, कनिष्ठ महाविद्यालयीन, महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षकांना लागू करण्यात आली आहे. मात्र स्वग्राम रजा प्रवास सवलतीला विकल्प म्हणून २८ मार्च १९९५ च्या शासन निर्णयाने लागू करण्यात आलेल्या "रजा प्रवास सवलतीच्या" सुविधेपासून सर्व स्तरावरील शिक्षकांना वंचित ठेवण्यात आले होते आता राज्यातील खाजगी माध्यमिक शाळांतील कर्मचाऱ्यांना ही "रजाप्रवास सवलत" लागू करण्याचा शासनाने निर्णय घेतला हे स्वागतार्ह आहे परंतु महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षकांना मात्र त्यापासून अजूनहि वंचित ठेवण्यात आले आहे याबाबत ही सभा तिव्र नापसंती व्यक्त करीत आहे. अस्तित्वात असलेल्या "स्वग्राम रजा प्रवास सवलतीला" विकल्प म्हणून महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षकांना "रजा प्रवास सवलत" तत्परतेने लागू करण्यात यावी अशी ही सभा महाराष्ट्र शासनास विनंती करीत आहे." "शासनास अशीही विनंती करण्यात येत आहे की ३० नोव्हेंबर १९८२ च्या शासन निर्णयाने महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षकांना लागू करण्यात आलेली स्व-ग्राम रजा प्रवास सवलत व २८ मार्च १९९५ च्या शासन निर्णयाने शासकीय कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आलेली "रजा प्रवास सवलत" समाज कल्याण खात्या अंतर्गत असलेल्या समाज कार्य महाविद्यालयातील शिक्षकांनाही लागू करण्यात येऊन तसे आदेश समाज कल्याण विभागातर्फे त्वरीत काढण्यात यावेत."

### *विषय क्रमांक १८९ :*
### *नुटाच्या काही सभासदांचा ''बायोडाटा'' नुटा बुलेटीनमध्ये प्रकाशित करणे :*

**Consideration dropped.** प्रस्तावक श्री.प्रा.रा.बा.देवरकर हे अनुपस्थित असल्यामुळे त्यांचा **पुढील प्रस्ताव मांडल्या गेला नाही. :-**

आज बऱ्याच प्राध्यापकांनी स्वतःला शैक्षणिक व सामाजिक उपक्रमामध्ये झोकून दिले आहे, तसेच अनेकांनी संशोधनपर कार्य करून उच्चप्रतीची शैक्षणिक गुणवत्ता प्राप्त केलेली आहे. अशा प्राध्यापकांच्या ह्या उपलब्धींचा अशा समकक्ष उपक्रमात कार्य करणाऱ्या व संशोधन कार्य करीत असणाऱ्या प्राध्यापकांना ह्या प्राध्यापकांशी संपर्क साधण्यास ह्या विशेषवृत्तामुळे (Bio-Data) मदत होवून त्यांना मार्गदर्शन मिळण्यास मदत होऊ शकते व त्यांना आपले संशोधन कार्य पूर्ण करण्यास त्यांची मदत घेता येईल. अशा

## राज्य शासकीय कर्मचारी व इतरांना दुसरी अंतरिम वाढ देणे

***महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय, क्रमांक वेपूर-१२९५/प्र. क्र. २०/सेवा-१०***

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १९ सप्टेंबर १९९५.

**पहा** - (१) शासन अधिसूचना, वित्त विभाग क्रमांक वेपुर-१२८८/१५४/सेवा-१० दिनांक १ ऑक्टोबर १९८८.

(२) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक वेपुर-१२९३/प्र.क्र. सेवा-१०, दिनांक ११ जानेवारी १९९४.

(३) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक वेपुर-१२९३/प्र. क्र. ५०/सेवा-१०, दिनांक १६ फेब्रुवारी १९९५.

**शासन निर्णय**

केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांना दिनांक १ एप्रिल १९९५ पासून दुसरी अंतरिम वाढ मंजूर करण्यात आलेली आहे. ही दुसरी अंतरिम वाढ राज्य शासकीय कर्मचारी व इतरांना दिनांक १ एप्रिल १९९५ पासून मंजूर करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. शासन आता असा आदेश देत आहे की, राज्य शासकीय कर्मचारी व इतरांना दिनांक १ एप्रिल १९९५ पासून मूळ वेतनाच्या १० टक्के परंतु कमीत कमी दरमहा रु. १०० या दराने दुसरी अंतरिम वाढ मंजूर करण्यात यावी व याबाबतची थकबाकी सर्व संबंधितांना रोखीने प्रदान करण्यात यावी.

२. अंतरिम वाढीची ही रक्कम एक वेगळीच स्वतंत्र रक्कम असेल. ती वेतन, भत्ता अथवा मजुरी म्हणून संबोधता येणार नाही. त्यामुळे पर्यायाने त्यावर महागाई भत्ता, घरभाडे भत्ता व स्थानिक पूरक भत्ता इत्यादी कोणत्याही प्रकारचे भत्ते अनुज्ञेय असणार नाहीत. तसेच रजेचे रोखीकरण, वेतन निश्चिती व निवृत्ती वेतन तथा उपदान इत्यादी सेवानिवृत्ती विषयक लाभांकरिताही ही रक्कम हिशोबात धरता येणार नाही.

३. महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ मधील नियम २७० शिथील करून शासन असा आदेश देत आहे की, अंतरिम वाढीची रक्कम सप्टेंबर १९९५ किंवा त्यानंतरच्या मासिक वेतन देयकामध्येच काढण्यात यावी. आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी नियमित वेतन देयकांत थकबाकीच्या रकमेची एक वेगळी बाब म्हणून राजपत्रित अधिकारी आणि अराजपत्रित कर्मचारी या सर्वांसाठी वेतन देयकांच्या आतील बाजूस स्तंभ ३ मध्ये व बाहेरील बाजूस बाब क्रमांक १ मध्ये मागणी करावी. दिनांक १ एप्रिल १९९५ नंतर शासकीय कर्मचाऱ्यांची एका कार्यालयातून/विभागातून दुसऱ्या कार्यालयात/विभागात बदली झाली असल्यास दिनांक १ एप्रिल १९९५ पासून नवीन कार्यालयात बदली होण्याच्या तारखेपर्यंतची थकबाकीची रक्कमसुद्धा नवीन कार्यालयानेच काढावी. यासाठी संबंधित कार्यालयाने, जुन्या कार्यालयाकडून रक्कम काढली नसल्याचे प्रमाणपत्र मागवून घ्यावे व नंतरच संपूर्ण कालावधीसाठीची मागणी करावी. कोणत्याही परिस्थितीत थकबाकीसाठी पुरवणी देयक सादर करण्यात येऊ नये.

४. शासन असाही आदेश देत आहे की, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनमानुसार वेतन घेणाऱ्या शिक्षकांना, अनुदानप्राप्त आयुर्वेद/युनानी महाविद्यालये व संलग्न रुग्णालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना तसेच शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक पीसीआर-१०८३/सीआर-१०८४/एसईआर-७ दिनांक ११ सप्टेंबर १९८४ च्या परिच्छेद ५ मध्ये नमूद केलेल्या विविध शैक्षणिक संस्थांमधील व विद्यापीठांमधील कर्मचाऱ्यांनाही हे आदेश योग्य फेरफारांसह लागू करण्यात यावेत. संबंधित विभाग प्रमुखांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सदरहू आदेश स्थानिक संस्थांच्या आणि सर्व संबंधित संस्थांच्या व्यवस्थापनांच्या निदर्शनास आणून द्यावेत आणि या आदेशानुसार कर्मचाऱ्यांना अंतरिम वाढ दिली जाईल याची खात्री करून घ्यावी. या कारणास्तव देय होणारे सहाय्यक अनुदान विद्यमान विहित दरानुसार दिले जाईल असेही त्यांनी व्यवस्थापनांना कळवावे.

५. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक पाच) कलम २४८ च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार व त्या संबंधातील इतर सर्व अधिकार यांचा वापर करून शासन असाही आदेश देत आहे की, जिल्हा परिषदांच्या पूर्णकालीक कर्मचाऱ्यांनासुद्धा उपरोक्त आदेश योग्य त्या फेरफारांसह लागू करण्यात यावेत.

६. राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना अंतरिम वाढ मंजूर केल्यामुळे होणारा अतिरिक्त खर्च शासन ज्ञापन, वित्त विभाग क्रमांक आकनि ११९५/०७५/अर्थसंकल्प-७, दिनांक १८ सप्टेंबर, १९९५ (८०००-०७५-८) अन्वये मागणी क्रमांक "जी-८, २०७०, इतर प्रशासनिक सेवा, ८००-इतर खर्च (चार) शासकीय कर्मचारी व इतर यांना अंतरिम सहाय्य (२०७००६२१) या लेखाशीर्षाखाली मंजूर करण्यात आलेल्या रु. २००,००,००,०००/- (रुपये २०० कोटी फक्त) च्या आकस्मिकता निधी अग्रिमातून करण्यात यावा. आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी सदर खर्च, अग्रिमाच्या प्रतिपूर्तीनंतर शेवटी कोणत्या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकावयाचा हे सूचित करावे. त्यानंतर अंतरिम वाढीवरील खर्च ज्या प्रमुख लेखाशीर्षाखाली खर्ची टाकावयाचा हे सूचित करावे. त्यानंतर अंतरिम वाढीवरील खर्च ज्या प्रमुख लेखाशीर्षाखाली खर्ची घालण्यात येतो, त्या लेखाशीर्षाखाली खर्ची घालण्यात यावा. नियंत्रक अधिकाऱ्यांनी पूरक मागण्या विधानमंडळाने संमत करताच या बाबीवरील खर्च संबंधित कार्यात्मक प्रमुख लेखाशीर्षाखाली खर्ची टाकावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**श. वि. लागवणकर,**
शासनाचे उप सचिव.

गुणवंत नुटा सभासद प्राध्यापकांचा जीवनपट (Bio-Data) नुटा बुलेटीन मध्ये क्रमशः प्रकाशित करण्यात येईल.

### *विषय क्रमांक १९० :*
### *ग्रंथपालांना उन्हाळी व हिवाळी सुट्या मंजूर करणे :*

शशिकांत वानखडे यांनी पुढील **प्रस्ताव सभागृहाच्या परवानगीने मागे घेतला.** :-

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ नुसार ग्रंथपालांचा समावेश शिक्षक संवर्गात झाला आहे. परंतु प्राध्यापकांना लागू असणाऱ्या कोठल्याही सेवाशर्ती, सवलती ग्रंथपालांना लागू करण्याचे स्पष्ट आदेश शासन वा विद्यापीठा मार्फत निर्गमित न करण्यात आल्याने महाविद्यालयांचे प्राचार्य प्राध्यापकांना लागू असणाऱ्या सेवाशर्ती, सवलती ग्रंथपालांना देण्यास असमर्थता दर्शवित आहेत. उदा. ग्रंथपालांना प्राध्यापकांप्रमाणे उन्हाळी वा हिवाळी सुट्या मंजूर करण्यात येत नाहीत. तसेच पुर्वी मिळणाऱ्या सरेंडर (अर्जित रजा) रजा ही नामंजूर करण्यात येतात. तेव्हा शासन व विद्यापीठाने १९९४ च्या विद्यापीठ कायद्यानुसार ग्रंथपाल पदाबद्दल स्पष्ट आदेश तातडीने निर्गमित करावेत अशी विनंती नुटाची आमसभा करीत आहे.

*राज्यातील अकृषि विद्यापीठे व त्यात संलग्न शासकीय व अशासकीय कला, विज्ञान, वाणिज्य व अध्यापक महाविद्यालये तसेच विधी महाविद्यालये, विज्ञान संस्थांमधील निवड श्रेणीमधील पी.एच.डी. धारक अधिव्याख्यात्यांना प्रपाठकाचे पदनाम देण्याबाबत...*

**महाराष्ट्र शासन**

***उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग***

शासन निर्णय क्रमांक : एससीटी १०९२/३७२०/(९२/९२) मशि-२

मंत्रालय विस्तार भवन; मुंबई४०० ०३२

**दिनांक : २३ मे, १९९५**

**वाचा** : (१) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. एनजीसी १९८६/१२२४/विशि-४ दिनांक २७.२.१९८९

(२) विद्यापीठ अनुदान आयोगाचे पत्र क्रमांक : एफ-१-१-१५/८६/ पी-३ दिनांक : २८.५.१९९२

(३) शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. आरएसपी-१९९३/३१११९/रिडर/९-अ दिनांक २४.८.१९९३

(४) शासन निर्णय क्र. एससीटी-१०९२/३७२०/(९२/९२) आस्था- २ दिनांक ४ फेब्रुवारी, १९९४.

(५) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग, क्रमांक : एससीटी १०९२/३७२०/(९२/९२)/मशि-२ दिनांक ४ मार्च १९९४.

(६) शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) यांचे पत्र क्र. ममअ २४९४/३३०८६/ प्रपाठक/प्रशा-२ दिनांक ११ डिसेंबर, १९९४.

**प्रस्तावना** :-

शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. एससीटी १०९२/३७२०/(९२/९२) मशि-२ दिनांक ४ मार्च १९९४ अन्वये राज्यातील अकृषि विद्यापीठातील व त्यास संलग्न असलेल्या शासकीय व अशासकीय कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालये व विज्ञान संस्थामधील अधिव्याख्यात्यांना, अधिव्याख्यात्याचे सेवेत असल्यापासून १६ वर्षानी व पी.एच.डी धारक अधिव्याख्यात्यांना तीन वर्षाची सूट देऊन १३ वर्षांनी रु. ३७००-५७०० ही निवडश्रेणी देण्यात येते, अशा निवड श्रेणीतील पी. एच. डी. धारक अधिव्याख्यात्यांना "प्रपाठक" हे पदनाम देण्याचे आदेश निर्गमित करण्यांत आलेले आहेत.

**शासन निर्णय** : राज्यातील अकृषि विद्यापीठातील व त्यास संलग्न असलेल्या शासकीय व अशासकीय कला, विज्ञान, वाणिज्य, अध्यापक व विधी महाविद्यालये आणि विज्ञान संस्थेमधील निवड श्रेणीतील पी.एच.डी. धारक असलेल्या अधिव्याख्यात्यांना रु. ३७००- ५७०० ही निवडश्रेणी देण्यात आलेल्या दिनांकापासून किंवा निवड श्रेणीतील अधिव्याख्यात्यांनी पी.एच.डी. ही शैक्षणिक अर्हता धारण केल्याच्या दिनांकापासून जो नंतरचा असेल त्या दिनांकापासून "प्रपाठक" हे पदनाम खालील अटींवर देण्यास शासनाची मंजुरी देण्यात येत आहे.

निवड श्रेणीतील पी.एच.डी. धारक अधिव्याख्यात्यांना **"प्रपाठक" हे पदनाम मिळाल्यानंतर त्यांची अधिव्याख्याता पदावरील कर्तव्ये व जबाबदाऱ्या कामाचे तास व स्वरूप पूर्वी प्रमाणेच कायम राहतील. त्यात कोणताही बदल होणार नाही.** तसेच त्यांची अधिव्याख्यात्याच्या संवर्गातील सेवाज्येष्ठता पूर्वीप्रमाणेच कायम राहील आणि त्यांना नामनिर्देशित प्रपाठक (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाव्दारा नियुक्त सरळसेवा प्रविष्ट प्रपाठक) हे सेवा जेष्ठता आणि इतर सर्व बाबतीत ज्येष्ठ राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**(ध.स.व्हटकर)**
उपसचिव, महाराष्ट्र शासन

### *विषय क्रमांक १९१ :*
### *ग्रंथपालांना सेवाजेष्ठता प्रदान करणे :*

**Consideration dropped.** प्रस्तावक श्री.प्रा. एच.बी.शेळके हे अनुपस्थित असल्यामुळे त्यांचा **पुढील प्रस्ताव मांडल्या गेला नाही.** :-

आजची हि सभा प्रस्ताव पारीत करते की, महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ च्या कलम २२ क नुसार ग्रंथपालांचा समावेश शिक्षकांच्या व्याख्येत झाल्याने ग्रंथपालांचा महाविद्यालयीन शिक्षक सेवाजेष्ठता यादीत समावेश करून शिक्षकांच्या सेवाशर्ती नियम व हिवाळी/उन्हाळी रजेसह अन्य सर्व शैक्षणिक सवलती लागू करण्याबाबत विद्यापीठांनी प्राचार्यांना स्पष्ट निर्देश द्यावेत अशी विनंती मा. कुलगुरू. अमरावती विद्यापीठ, अमरावती यांना करीत आहे.

### *विषय क्रमांक १९२ :*
### *किमान मर्यादेपेक्षा विद्यार्थी संख्या कमी असल्यास शिक्षण शुल्क अवेतनिक अनुदानातून कपात होणे :*

शं.गो.वासाडे यांनी मांडलेला पुढील प्रस्ताव **सम्मत करण्यात आला.** :-

सद्यःस्थितीत वाणिज्य शाखेत ग्रामीण भागात विद्यार्थी संख्या शासनाने ठरवून दिलेल्या किमान विद्यार्थी संख्येपेक्षा कमी असल्याचे दिसून येते. त्यामुळे शासन कमी असलेल्या विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात शिक्षण शुल्क महाविद्यालयाच्या अवेतनिक अनुदानातून कपात करते, त्यामुळे ग्रामीण भागातील महाविद्यालयांना आपला विकास करणे अडचणीचे होत आहे. शासनाने ह्या धोरणात बदल करून पूर्ण अवेतनिक अनुदान महाविद्यालयांना द्यावे अशी विनंती करण्यात येत आहे.

### ITEM NO. 193 :
### *PART TIME TEACHER BE REDESIGNATED AS A FULL TIME TEACHER :*

**Consideration dropped.** प्रस्तावक श्रीमती. पी.पी.उपदेव ह्या अनुपस्थित असल्यामुळे त्यांचा **पुढील प्रस्ताव मांडल्या गेला नाही.** :-

Be it resolved to request the Government of Maharashtra that when the workload of particular subject in the college increases, the part time teacher in that subject who is selected by a duly constituted selection Committee and who had completed his/her services for two years in clear vacancy in that college should be redesignated as a full time teacher in that subject from the day of such increase in the work load.

### *वषय क्रमांक : १९४*
### सभा व्यवस्थेबद्दल आभार :

सचिवांनी महाविद्यालयाचे प्राचार्य व स्थानिक शाखेच्या इतर प्राध्यापकांनी, जिल्हा नुटाचे अध्यक्ष, सचिव व सदस्य यांनी, ही सभा यशस्वी करण्यासाठी घेतलेल्या परिश्रमांबद्दल आणि दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे मनःपुर्वक आभार मानले. शेवटी सर्व उपस्थित सदस्यांचे आभार मानून सभा संपली असे अध्यक्षांनी जाहीर केले.

स्वा / **बी.टी.देशमुख**
*अध्यक्ष*

स्वा / **एकनाथ कठाळे**
*सचिव*

# अमरावती विद्यापीठाचे शिक्षक भवनाच्या वास्तूबाबत विद्यापीठ अधिनियमाचा भंग केल्याचा शासनाचा आरोप.

***यासंबधी सर्वश्री.बी.टी.देशमुख, व्ही.यु.डायगव्हाणे, पी.जी.दस्तुरकर, जयवंत ठाकरे, सुरेश पाटील यांनी दिलेली लक्षवेधी सुचना.***

**महाराष्ट्र विधानपरिषद : गुरूवार, दिनांक १४ डिसेंबर १९९५. : तिसरे अधिवेशन १९९५**

**प्रा.बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवीधर)** : सभापती महोदय. मी नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो. व याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

शिक्षक भवनाच्या वास्तूबाबत अमरावती विद्यापीठाने महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम ८ (१) (ड) चा भंग केला आहे असा ३० सप्टेंबर १९९५ च्या पत्रान्वये शासनाने विद्यापीठावर केलेला गंभीर आरोप संपूर्णपणे असत्य असल्याचा २० नोव्हेंबर १९९५ च्या पत्रान्वये या विद्यापीठाने केलेला खुलासा, १९८३ च्या अमरावती विद्यापीठ कायदा कलम २५ (१) (XIV) प्रमाणे दाननिधी स्वीकारण्याच्या विधिमय अधिकाराचा वापर करून २९ एप्रिल १९८९ च्या सभेत या विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेने १ लाख रुपयाचा दाननिधी स्वीकारणे, तो ज्या कामासाठी स्वीकारला त्या कामासाठीच काटेकोरपणे त्याचा वापर करणे, असे असतांना शासनाने ३० सप्टेंबर १९९५ च्या पत्रान्वये विद्यापीठावर केलेला गंभीर आरोप, ही सर्व वस्तुस्थिती अमरावती विद्यापीठ सिनेटच्या २६ नोव्हेंबर १९९५ रोजीच्या बैठकीमध्ये प्रश्नोत्तरातून जाहीरपणे समोर आल्याने जनमानसात निर्माण झालेली संतापाची भावना, ३० सप्टेंबर १९९५ चे पत्र तातडीने मागे घेण्याची आवश्यकता व याबाबत शासनाने केलेली व करावयाची कारवाई.

**अनिल देशमुख (उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री)** : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेवरील निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी हे निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

### *मा. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांचे निवेदन*

डॉ.उध्दव देशमुख अमरावती यांनी त्यांच्या पत्नीच्या स्मृतिप्रित्यर्थ अमरावती विद्यापीठास रुपये १ लाख दाननिधी दिला होता. त्या देणगीतून विद्यापीठाने "स्व.डॉ.जयश्री देशमुख शिक्षक भवन" ची वास्तू विद्यापीठ परिसरात उभारली. संलग्न महाविद्यालये व विद्यापीठ यातून काम करणाऱ्या बहुसंख्य शिक्षकांच्या पंजीकृत असलेल्या कार्यरत संघटनेच्या कामकाजासाठी या वास्तूचा वापर व्हावा असा त्यामागील दृष्टिकोन होता. तथापि सदरहू शिक्षक भवनाची वास्तू विद्यापीठाने, व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक ३.६.१९९५ च्या निर्णयानुसार नागपूर विद्यापीठ शिक्षक संघटनेस वापराकरिता दिनांक ११ जून १९९५ रोजी उपलब्ध करून दिली. ही वास्तू जरी देणगीच्या रकमेतून बांधली गेली असली तरी ती विद्यापीठाच्या ताब्यातील व अधिकारातील मालमत्ता ठरते व अशी स्थावर मालमत्ता अन्य कुणास १० वर्षासाठी वापरास देताना किंवा हस्तांतरण करताना विद्यापीठाने म.वि.का. १९९४ च्या कलम ८ (१) (इ) प्रमाणे राज्य शासनाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक होते. तसेच याबाबतीत विद्यापीठ अंतर्गत कार्यरत इतर संघटनांनी तीव्र आक्षेप घेतला होता.

या संदर्भात शासनाच्या असे निदर्शनास आले की, म.वि.का.१९९४ च्या कलम ८ (१) (इ) चा विद्यापीठाने भंग केला आहे. सबब कलम ८ (४) प्रमाणे शासनाने दिनांक ३० सप्टेंबर, १९९५ च्या पत्रान्वये विद्यापीठास ही स्थावर मालमत्ता परत घेण्यासंबंधीचे आदेश दिलेत. **तेव्हा यामुळे विद्यापीठावर गंभीर आरोप करण्यात आलेला नसून,** विद्यापीठाने कायद्यानुसार असलेला अधिकार व कर्तव्य यांचा योग्य वापर करण्याचे निदेश देण्यात आले. **विद्यापीठाने यासंबंधी शासनास दिनांक २० नोव्हेंबर, १९९५ रोजी निवेदन दिले असून त्यावर शासन विचार करीत आहे.** त्यामुळे जनमानसात संतापाची भावना निर्माण होण्याचे काही कारण नाही.

### *निवेदनानंतर झालेली चर्चा*

**प्रा.बी.टी.देशमुख** : सभापती महोदय, वितरीत करण्यात आलेल्या निवेदनात आम्ही सूचना देवून सुध्दा काही बाबींची वस्तुस्थिती आली नाही. त्याकरिता मला दोन तीन प्रश्न विचारण्याची संधी द्यावी. पहिला प्रश्न असा की, १९८३ च्या अमरावती विद्यापीठ कायदा कलम २५ (१) (XIV) मध्ये म्हटले आहे की, To accept on behalf of University, Trust, donations..... हे कार्यकारी मंडळाचे त्यावेळी अधिकार होते. ते अधिकार आज व्यवस्थापन मंडळाला आहेत व त्यावेळी होते. माझा पहिला प्रश्न असा की, आपल्याला माहीत आहे की, शिक्षकेतर कर्मचारी आणि शिक्षक कर्मचारी यांच्या संघटनासाठी आपल्या परिसरात लहानमोठी जागा विद्यापीठ परिसरात दिली जाते. अमरावती विद्यापीठात ते सुरुवातीला शक्य नव्हते, कारण विद्यापीठालाच जागा नव्हती. म्हणून हे १ लाख रुपयाचे डोनेशन १९८९ मध्ये स्वीकारण्यात आले. मला अशी माहिती पाहिजे की, संलग्न महाविद्यालये आणि विद्यापीठातून काम करणाऱ्या बहुसंख्य शिक्षकांच्या पंजीकृत असलेल्या कार्यरत संघटनेच्या कामकाजासाठी या वास्तूचा वापर व्हावा आणि तिला जयश्री देशमुख शिक्षक भवन असे नाव द्यावे अशाप्रकारची विनंती दानदात्यांनी केली होती का? आणि १९८९ मध्ये १ लाख रुपये दान त्यांनी दिले ती त्यांची विनंती त्यावेळच्या कार्यकारी मंडळाने विचारात घेवून Considered and resolved to accept the request contained in the letter. अशा प्रकारचा ठराव केला होता व मान्य केला होता ही गोष्ट खरी आहे काय?

**श्री. अनिल देशमुख** : खरी आहे.

**प्रा.बी.टी.देशमुख** : ही गोष्ट खरी असेल तर मग संलग्न महाविद्यालय आणि विद्यापीठ यामधून काम करणाऱ्या बहुसंख्य शिक्षकांच्या पंजीकृत असलेल्या कार्यरत संघटनेच्या कामकाजासाठी या वास्तूचा वापर व्हावा म्हणून १९९४ मध्ये वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देवून या विद्यापीठाने अशाप्रकारचे अर्ज शिक्षक संघटनाकडून मागविले होते ही गोष्ट खरी आहे काय आणि त्यामध्ये त्या संघटनेचे नाव, तिच्या स्थापनेचे वर्ष आणि तिचे तीन वर्षाचे बॅलन्सशीट, इन्कम आणि एक्सपेंडीचर, आणि सदस्य संख्या हे विद्यापीठाने जाहिरात देवून मागविले होते हे खरे आहे काय?

**श्री. अनिल देशमुख** : सभापती महोदय, यामध्ये मूळ प्रश्न असा आहे की....

**प्रा.बी.टी.देशमुख** : सभापती महोदय आम्हाला पुढील प्रश्न विचारण्यासाठी या प्रश्नांचे उत्तर आले पाहिजे. तो आमचा अधिकार आहे. तेव्हा मी म्हटल्याप्रमाणे १९९४ मध्ये विद्यापीठाने जाहिरात देवून माहितीसह पंजीबध्द शिक्षक संघटनांकडून अर्ज मागविले होते ही गोष्ट खरी आहे काय?

**श्री. अनिल देशमुख** : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे.

**प्रा.बी.टी.देशमुख** : तर मग माझा या लक्षवेधी सूचनेवरील महत्त्वाचा प्रश्न असा की, त्यांनी कलम ८(१) (ई) चा भंग झाला असे म्हटले आहे. त्या पत्रात 'ड' असे आहे. टायपिंग मिस्टेक कदाचित झाली असेल, पण ठीक आहे. शासनाच्या ३० सप्टेंबर १९९५ च्या पत्रात या "कलम ८ (१) (ई) चा विद्यापीठाने भंग केला आहे" असे म्हटले आहे. आणि आता या शासनाच्या निवेदनात म्हटले आहे की, हा काही गंभीर आरोप नाही. त्यांनी विद्यापीठाला पत्र लिहून कळविले की, तुम्ही कायद्याच्या या ८ (१) (ई) चा भंग केला आहे." गंभीर आरोप यापेक्षा वेगळा काय असतो? सभापती महोदय या कलम ८(१)(इ) मध्ये असे आहे की, शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय विद्यापीठाला स्थावर मालमत्तेची विक्री करता येणार नाही, किंवा ती भाडेपट्टीने देता येणार नाही. तरमग मी आपल्याला असे विचारतो की, हा हुकूम काढण्यापूर्वी आपण याची खात्री करून घेतली होती का? की ही इमारत भाडेपट्टीने दिली आहे की, विक्रिव्दारे हस्तांतरीत केली आहे याची खात्री केली होती का?

**श्री.अनिल देशमुख** : सभापती महोदय, यामध्ये महत्त्वाचा प्रश्न असा

**शिक्षण राज्यमंत्री म्हणतात "तीन वेळा सांगितले आता चौथ्यांदा सांगतो.... हे तपासून घेऊ."**

की, १९९४ च्या कलम ८(१)(ई) प्रमाणे कोणतीही मालमत्ता लिजवर द्यावयाची किंवा ट्रान्सफर करावयाची किंवा भाड्याने द्यावयाची असेलतर त्यासाठी शासनाची पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता आहे. यामध्ये महत्त्वाचा एकच मुद्दा असा की, मॅनजमेंट कौन्सिलने निर्णय घेतला ही गोष्ट खरी आहे. तो निर्णय घेतल्यानंतर शासनाची पूर्व परवानगी घ्यावयास पाहिजे होती हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे. त्यांनी शासनाची पूर्व परवानगी न घेतल्यामुळे.....

**प्रा.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, पूर्व परवानगी कशासाठी घ्यावयास पाहिजे? त्या विद्यापीठाच्या निर्णयात असे म्हटले आहे की, कार्यालयीन वापरासाठी ही जागा देण्यात येत आहे. जशी मुंबईला दिली, नागपूरला दिली २५-३० वर्षा अगोदर तेथे झालेले हे निर्णय आहेत. म्हणून मी असे म्हणालो की, पूर्व परवानगी कशासाठी घ्यावी लागते? (१) स्थावर मालमत्तेचे विक्रिव्दारे हस्तांतरण असेल तर किंवा (२) भाडे पट्टीव्दारे हस्तांतरण असेल तर त्यासाठी पूर्व परवानगी घ्यावी लागते. मी विचारतो की, हे हस्तांतरण विक्रिव्दारे झाले की, भाडेपट्टीव्दारे झाले?

**श्री. अनिल देशमुख :** हे तपासून पहाण्यात येईल.

**प्रा.बी.टी.देशमुख :** काय तपासून पहाण्यात येईल? म्हणजे तपासून पाहिल्याशिवाय उत्तर दिले आहे का?

**श्री. दी.बा.पाटील :** अध्यक्ष महोदय. माझा हरकतीचा मुद्दा आहे. मा. सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी स्पेसिफीक प्रश्न विचारला आहे की कलम ८ (१) (इ) प्रमाणे स्थावर मालमत्तेची विक्री करणे किंवा भाडेपट्ट्याने द्यावयाची असल्यास शासनाची पूर्व परवानगी आवश्यक आहे. याठिकाणी त्या नियमाचा भंग झाला आहे. म्हणून नोटीस दिलेली आहे. नोटीस दिली याचा अर्थ पूर्व परवानगी घेतली नाही. विक्री किंवा भाडेपट्ट्याने दिले की नाही याची मंत्रीमहोदयाना माहिती नाही असे मंत्री महोदय म्हणतात. सरकारने जी कारवाई केली आहे ती माहिती त्यांच्या जवळ नाही असे मंत्री महोदय म्हणतात. सरकारने जी कारवाई केली आहे ती माहिती त्यांच्या जवळ नाही. माहिती न घेता असे उत्तर दिलेले आहे. हे उत्तर गृहित धरले जाईल काय?

**श्री. अनिल देशमुख :** अध्यक्ष महोदय, लिज किंवा ट्रान्सफर असेल पूर्व परवानगी घेतली नाही अशी हरकत सरकारने घेतली आहे. ही कायदेशीर बाब आहे त्यामुळे संपूर्ण प्रकरण विधी व न्याय विभागाकडे पाठविण्यात येईल.

**श्री.बी.टी.देशमुख :** अध्यक्ष महोदय, याबाबत माहिती घेण्यात येईल असे मंत्री महोदयांनी सांगितले. त्यांनी कबूल केलेले आहे की विद्यापीठाचे २० नोव्हेंबरचे पत्र शासनाला मिळाले आहे. आपल्या या पत्रामध्ये विद्यापीठाने असे शासनाला कळविले आहे काय की, स्थावर मालमत्ता विक्री केलेली नाही वा भाड्याने दिली नाही वा हस्तांतरण केलेले नाही. असे कळविले आहे काय?

**श्री. अनिल देशमुख :** अध्यक्ष महोदय, तसे कळविले आहे.

